**महाराष्ट्र शासन**

**सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग**

**रेशीम संचालनालय,महा.राज्य,नागपूर**

प्रशासकीय इमारत क्र.2, सहावा माळा,बि विंग,सिव्हील लाईन,नागपूर

दुरध्वनी क्र.0712- 2569926/28

Website : www.mahasilk.maharashtra.gov.in E-mail :- dos.maha@gmail.com

---

**रेशीम संचालनालय,नागपूर अंतर्गत गट क व ड मधिल अनुसूचित जमाती विशेष भरती सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीची जाहिरात**

**जाहिरात क्रमांक**-1/2020. **दिनांक** 13/03/2020

महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.बीसीसी 2018/प्र.क्र.308/16-ब, मंत्रालय, मुंबई दि.21 डिसेंबर,2019 अन्वये रेशीम संचालनालयातील अनुसूचित जमाती प्रवर्गातील निर्माण करण्यात आलेल्या अधिसंख्य पदामुळे रिक्त झालेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील गट क व गट ड पदे सरळसेवेने भरावयाची आहेत.त्यासाठी अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र व अहर्ताधारक उमेदवारांकडून विहित नमुद अर्ज ऑफलाईन पदध्तीने मागविण्यात येत आहे.

1. **अर्ज करण्याची पध्दत:-**

| | |
|---|---|
| 1 | प्रस्तुत परीक्षेकरीता फक्त ऑफलाईन पदध्तीने अर्ज स्विकारण्यात येईल. |
| 2 | पात्र उमेदवारांनी संचालक, तथा अध्यक्ष, राज्यस्तरीय निवड समिती, रेशीम संचालनालय, नागपूर यांचे नांवे विहित नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक राहील. |
| 3 | सर्व पदांकरीता ऑफलाईन अर्ज स्विकारण्याचा दिनांक जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासुन ते 31/03 /2020 पर्यंत सांय.6.15 वाजेपर्यंत राहील. तदनंतर अर्ज स्विकारण्यात येणार नाही. |

2. **परीक्षा शुल्क :-**
   - अनुसूचित जमातीच्या उमेदवारांनी रू.150/-परीक्षा शुल्क हे DDO ACCOUNT OFFICER, DIRECTORATE OF SERICULTURE, NAGPUR यांचे नावाने स्टेट बँक ऑफ इंडीया, सिव्हील लाईन, नागपूर शाखेला देय असलेला राष्ट्रीयकृत बँकेचा मागणी धनाकर्ष (D.D) अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

3. **अनुसूचित जमाती विशेष सरळसेवा भरती 2020 अन्वये भरावयाच्या पदांची नावे, रिक्त पद संख्या, सामाजिक आरक्षण व समांतर आरक्षणानुसार पदांचा एकत्रित तपशिल खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | पदाचे नांव | प्रवर्ग | एकूण पदसंख्या | महिला | सर्वधारण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | वरीष्ठ तांत्रिक सहायक | अनुसूचित जमाती | 2 | --- | 2 |
| 2 | प्रयोगशाळा परीचर | अनुसूचित जमाती | 1 | --- | 1 |

**टिप**- 1. वरील पदासाठी अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र धारक उमेदवारांनीच अर्ज करावे. ज्या उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नाही, असे उमेदवारांनी अर्ज सादर करु नये.

2. निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही ठिकाणी करणेत येईल.

4. **वरील कोष्टकात नमूद पदांकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुषंगिक बाबीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | पदाचे नांव | वेतनस्तर | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|
| 1 | वरीष्ठ तांत्रिक सहायक (गट-क) | एस – 10 29200-92300 | 1) उमेदवाराने कृषीशास्त्र किंवा रेशीम किंवा जीवशास्त्र किंवा प्राणिशास्त्र किंवा वनस्पतीशास्त्र किंवा वस्त्रोद्योग अभियांत्रिकी किंवा जैविक विज्ञान यापैकी कोणत्याही विषयासह विज्ञान शाखेतील पदवी धारण केलेली असावी.<br>2) मराठी व हिंदी भाषेचे पुरेसे ज्ञान असावे.<br>परंतू ज्या उमेदवारांकडे रेशीम विषयातील स्नातकोत्तर पदवी किंवा पदविका किंवा या विषयातील असामान्य अनुभव असेल अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. |
| 2 | प्रयोगशाळा परीचर (गट-ड) | एस – 1 15000-47600 | 1) उमेदवारांनी किमान आठवी (8 वी) परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.<br>2) मराठी व हिंदी भाषेचे पुरेसे ज्ञान असावे. |

5. **वरील सर्व पदांसाठी आवश्यक सामाईक अहर्ता खालीलप्रमाणे असेल.**

| **अ.क्र.** | **सामाईक अर्हता** | **तपशिल** |
|---|---|---|
| 1 | संगणक अर्हता (अ.क्र.2 वरील प्रयोगशाळा परीचर पदासांठी लागु नाही ) | सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण 2000/प्र.क्र.61/ 2001/39 दिनांक 19/03/2003 मधील तरतुदीनुसार (अ) D.O.E.A.C.C सोसायटीच्या CCC किंवा O स्तर किंवा B किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र उच्च व तंत्र शिक्षण मंडळ,मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र यापैकी एक प्रमाणपत्र किंवा माहिती तंत्रज्ञान (साप्रवि) विभागाच्या शासन निर्णय क्रमांक मातंस-2015/प्र.क्र.277/39 दिनांक 04.02.2013 व शासन पुरकपत्र क्रं.मातंस 2012/प्र.क्र.270/39 दिनांक 08.01.2018 मध्ये नमूद केल्यानूसार आवश्यक संगणक अर्हता विहित मुदतीत प्राप्त करणे बंधनकारक आहे. |
| 2 | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र | महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम-2005 मधिल तरतुदीनुसार शासकीय सेवेतील भरतीमध्ये विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र नियुक्ती वेळेस हजर होतांना विवाहित उमेदवारांनी सादर करणे बंधनकारक राहील.<br>प्रतिज्ञापत्रात नमूद केल्यानुसार हयात असेलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक 28 मार्च,2005 वा तदनंतर जन्माला आलेल्या,अपत्यामूळे उमेदवार शासकीय सेवेच्या नियुक्तीसाठी अपात्र ठरविण्यास पात्र होईल. |

6. **वयोमर्यादा** – वरील सर्व पदांसाठी उमेदवार अर्ज भरण्याच्या अंतीम तारखेस 18 वर्षापेक्षा कमी वयाचा व 43 वर्षापेक्षा जास्त वयाचा नसावा. ( शा.नि.साप्रवि दि.25/4/2016 नुसार )

7. **उमेदवारांना अर्ज सादर करीत असतांना खालील दस्तऐवजांच्या छायांकित प्रती स्वसांक्षाकीत करुन जोडणे आवश्यक आहे.**

1) शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र 2) जात प्रमाणपत्र 3) जात वैधता प्रमाणपत्र 4) उमेदवारांचा वयाचा पुरावा
5) अधिवास प्रमाणपत्र 6) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र
7) DDO ACCOUNT OFFICER, DIRECTORATE OF SERICULTURE, NAGPUR यांचे नावाने देय असलेला राष्ट्रीयकृत बँकेचा रु. 150/- धनाकर्ष (D.D)
8) उमेदवारांनी प्रवेश पत्रासाठी संपूर्ण नाव व पत्ता लिहलेला 01 लिफाफा व 02 पासपोर्ट साईज फोटो अर्जासोबत जोडावे.

9) विहित नमुन्यातील अर्ज फोटो लावून संपुर्ण भरणे आवश्यक राहील.

ऑफलाईन अर्जासोबत उपरोक्त नमूद 1 ते 9 दस्ताऐवज सादर न केलेल्या उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी अपात्र ठरविण्यात येईल यांची उमेदवारांची नोंद घ्यावी.

**8. प्राप्त अर्जाची छाननी नंतर ज्या उमेदवारांचे अर्ज वैध ठरतील असे उमेदवार पुढील टप्प्यासाठी पात्र ठरतील व त्यांची लेखी परीक्षा नागपूर मुख्यालयात घेण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

1) लेखी परीक्षाकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांना प्रवेशपत्र पाठविण्यात येईल. ज्या उमेदवारांना प्रवेशपत्र मिळाले नाही त्यांना परिक्षेच्या आदल्या दिवशी रेशीम संचालनालय,नागपूर येथे कार्यालयीन वेळेत देण्यात येईल. सदर प्रवेशपत्र निवड प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर उमेदवारांना दाखवणे अनिवार्य राहील.

**9. वरील सर्व पदांसाठी पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा घेण्यात येईल लेखी परीक्षेचा तपशील खालील प्रमाणे आहे.**

| अ. क्र. | पदांचे नांव | मराठी | इंग्रजी | सामान्य ज्ञान | बौध्दीक चाचणी | एकुण गुण | एकुण प्रश्न | परीक्षेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वरीष्ठ तांत्रिक सहायक | 50 | 50 | 50 | 50 | 200 | 100 | 90 मिनीट |
| 2 | प्रयोगशाळा परीचर | 50 | 50 | 50 | 50 | 200 | 100 | 90 मिनीट |

**10. लेखी परीक्षेचा दर्जा / स्तर**

1) लेखी परिक्षेतील प्रश्नांचा स्तर हा त्या-त्या पदांच्या सेवाप्रवेश नियमामध्ये विहित करण्यात आलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेपेक्षा निम्न असणार नाही.

2) ज्या पदाकरीता पदवी ही कमीतकमी अर्हता आहे अशा पदांकरीता परिक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापिठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील.परंतु त्यापैकी मराठी व इंग्रजी या विषयांच्या प्रश्न पत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील.

3) लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या असतील.

**11. परीक्षेस प्रवेश –**

1) लेखी परीक्षेकरीता प्रवेशपत्र प्राप्त करणे व कागदपत्र पडताळणीसाठी व भरती प्रक्रीयेच्या पुढील टप्प्यासाठी येण्या-जाण्यासाठी येणारा खर्च उमेदवाराला स्वत: करावा लागेल.

2) लेखी परीक्षा ही नागपूर मुख्यालयात घेण्यात येईल.

3) प्रवेशपत्र प्राप्त करण्याच्या वेळी व परीक्षेच्या वेळी उमेदवाराने खालील पैकी एक सध्याचे वैध फोटो असलेले ओळखपत्र पुरावा म्हणून सोबत ठेवणे अनिवार्य आहे.

1) पॅनकार्ड 2) पासपोर्ट 3) वाहन अनुज्ञप्ती 4) मतदार ओळखपत्र 5) आधार कार्ड

4) लेखी परीक्षाच्या वेळी फक्त पेन, परीक्षा प्रवेशपत्र, ओळखीचा पुरावा सोबत आणावे.

5) डिजिटल डायरी,पेजर,मायक्रोफोन,मोबाईल फोन,कॅमेरा अंतर्भुत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड ब्ल्यू टुथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्यायोग्य कोणतीही वस्तु इलेक्ट्रानीक्स उपकरणे, वहया,नोटस,परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, परिगणक (Calculator) इत्यादी प्रकारची साधने / साहित्य परीक्षा केंद्राच्या परीसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास,स्वत:जवळ बाळगण्यास,त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे.असे साहित्य आणल्यास ते परीक्षा केंद्राबाहेर ठेवण्याची व त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबधित उमेदवारांची राहील.

6) परीक्षा दालनात परीक्षेच्या वेळेपुर्वी 30 मिनीटे अगोदर हजर राहणे बंधनकारक राहील.परीक्षावेळी इकडे तिकडे बघणे, डोकावणे, तोतयागिरी करातांना आढळल्यास उमेदवारास परीक्षा केंद्राबाहेर पाठविण्यात येईल.

7) निवडणुक अथवा नैसर्गिक आपत्ती किंवा अन्य कारणामूळे विहित दिवशी परीक्षा घेणे शक्य झाले नाही तर सोयीच्या अन्य दिवशी परीक्षा घेण्यात येईल.

**12. लेखी परीक्षेनंतर निवडीची कार्यपध्दती** – उपरोक्त पदाकरीता घेण्यात आलेल्या 200 गुणांच्या लेखी परीक्षेमध्ये किमान 45 % गुण प्राप्त उमेदवारांची गुणांचे आधारे अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल.

**13. महत्वाच्या सुचना –**

1) उमेदवारांना प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा लागेल. लिफाफावर पदाचे नांव ठळक अक्षरात नमुद करावे. प्रत्येक अर्जासोबत रु.150/- चा डी.डी जोडणे बंधनकारक राहील.

2) उमेदवाराने भरणा केलेले परिक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीमध्ये परत केले जाणार नाही.

3) उमेदवारांची निवड होवुन नियुक्ती मिळाल्यास त्यांना शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या सेवा प्रवेशोत्तर परीक्षा, विभागीय परीक्षा आणि इतर परीक्षा व प्रशिक्षण विहित संधीत, कालावधीत उत्तीर्ण व्हावे लागेल. अन्यथा शासनाने वेळोवेळी विहित केलेप्रमाणे सदरची नियुक्ती संपुष्टात आणने इत्यादी कारवाई केली जाईल.

4) निवड प्रक्रीया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात नमूद केलेली माहिती / अगर बनावट कागदपत्रे सादर केल्याचे / उमेदवाराने सादर केलेली माहिती वस्तुस्थिती दर्शक नसल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे केव्हाही निदर्शनास आल्यास केलेली निवड / नेमणूक रद्द करण्यात येईल.

5) शासन निर्णय,वित्त विभाग क्रमांक अनियो/10/05/126/सेवा-4,दिनांक 31/10/2005 नुसार दि 01/11/2005 रोजी व त्यानंतर निवड होणा-या उमेदवारांना नवीन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना लागु राहील. त्यांना सध्या अस्तीत्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम,1984 आणि सध्या अस्तीत्वात असलेली महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम लागु होणार नाही.

6) महिला उमेदवार या संमातर आरक्षणाचे प्रवर्गातून पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदासांठी त्या – त्या सामाजिक प्रवर्गातुन सर्वसाधारण (संमातर आरक्षण विरहीत) पात्र उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार विचार होवू शकेल.

7) ज्या उमेदवारांनी यापुर्वी जरी त्यांचे नाव रोजगार मागदर्शन केंद्राकडे, सेवायोजन कार्यालय, समाजकल्याण,आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तसेच जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालयात नावे नोंदविली असली तरी अशा उमेदवारांना विहित मुदतीत स्वतंत्र रित्या ऑफलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे व परीक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील.

8) उमेदवारांनी अर्जामध्ये केलेल्या दाव्याच्या पृष्टार्थ सर्व प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. अर्जाची छाननी केल्यानंतर कोणतेही प्रमाणपत्र स्वीकारले जाणार नाही.

9) परीक्षेसाठी सर्व पात्र / अपात्र उमेदवारांची यादी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर व संकेतस्थळ https://mahasilk.**maharashtra**.gov.in वर प्रसिध्द करण्यात येईल.

10) पदभरती संदर्भात वाद/तक्रारीबाबत संचालक,रेशीम संचालनालय,नागपूर यांना अंतीम निर्णय घेण्याचे अधिकार राहतील. तसेच न्यायालयीन वाद उदभवल्यास त्याचे कार्यक्षेत्र नागपूर राहील.

11) कोणत्याही कारणास्तव रिक्त पदाच्या संख्येत बदल अथवा भरती रद्द झाल्यास याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार,पदांची संख्या, संमातर आरक्षणाबाबत बदल करणे, परीक्षा स्थगीत वा रद्द करणे, अंशत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार प्रशासनाने राखून ठेवले आहे.याबाबत कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

12) या जाहिरातीत नमूद केलेल्या पदावर उमेदवारांची निवड ही न्यायालयीन निर्णय, शासनाच्या विविध विभागाच्या शासन निर्णय व परिपत्रके यांतील निर्देशांच्या अधिन असेल.

13) भरती प्रक्रीयेसंबधी सुधारीत व अद्यावत सुचना रेशीम संचालनालय,नागपूर च्या नोटीस बोर्ड व संकेतस्थळ https://mahasilk.maharashtra.gov.in वर प्रसिध्द करण्यात येईल.उमेदवारांनी स्वत:हुन वेळोवेळी प्राप्त करुन घ्यावी.

14) सदर पदांचा परिविक्षा कालावधी एक वर्षाचा राहील.

15) अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र धारक उमेदवारांनीच अर्ज करावे.

16) शासन सेवेत असलेल्या उमेदवारांनी नियुक्ती प्राधिका-यांच्या परवानगीने अर्ज करावा.

**ऑफलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याचा पत्ता –**

मा.संचालक, रेशीम संचालनालय,महाराष्ट्र राज्य,नागपूर
प्रशासकीय इमारत क्र.2, सहावा माळा,बी- विंग,
आयुक्त कार्यालय परिसर, सिव्हील लाईन, नागपूर – 440001

दिनांक :- 13/03/2020
ठिकाण: नागपूर

स्वा/-
भाग्यश्री बानायत (भा.प्र.से)
संचालक तथा अध्यक्ष,राज्यस्तरीय निवड समिती
रेशीम संचालनालय,महा.राज्य,नागपूर

**रेशीम संचालनालय अंतर्गत गट क व गट ड अनुसूचित जमाती विशेष भरती मोहिम सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीची जाहिरात सन 2020**

<u>अर्जाचा विहित नमुना</u>

अर्जाचा कार्यालयीन क्रमांक - ……………………

प्राप्त दिनांक - / / 2020

**प्रति,**
मा.संचालक
तथा अध्यक्ष,राज्यस्तरीय निवड समिती,
रेशीम संचालनालय,नागपूर

| उमेदवाराचा अलीकडे काढलेला फोटो |
|---|

**विषय :- विशेष भरती मोहिमेअंतर्गत अनुसूचित जमाती या प्रवर्गात राखीव असलेल्या -**
**------------------------------------------------------------------- पदाकरीता अर्ज**

मा.महोदय,

संचालनालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली विस्तृत जाहिरात मी काळजीपुर्वक वाचली असून जाहिरातीच्या अनुषंगाने माझ्या जातीचा प्रवर्ग हा अनुसुचित जमाती असून मी ------------------------------------------- या पदासाठी अर्ज करीत आहे.सदर पदाकरीता आवश्यक असलेली माहिती खालीलप्रमाणे असून मी सदर अर्जासह विस्तृत जाहिरातीनुसार अनिवार्य दस्ताऐवजाच्या स्वसांक्षाकीत छायाप्रती सोबत जोडलेल्या आहेत.

| आवेदन शुल्काबाबतचे विवरण (ना – परतावा रक्कम ) | | | | |
|---|---|---|---|---|
| धनाकर्ष (डिमांड ड्रॉफट) क्रमांक | दिनांक | रक्कम | बँकेचे नांव | शाखेचे नांव |
| | | | | |

| 1 | अर्जदाराचे संपुर्ण नांव | आडनांव | | नांव | | वडीलांचे/पतीचे नांव | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मराठी | | | | | | | | |
| | इंग्रजी ( In Capital Letter) | | | | | | | | |
| 2 | पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता | | | | | | | | |
| 3 | कायमचा पत्ता | | | | | | | | |
| 4 | ई-मेल | | | भ्रमणध्वनी क्र. | | | | | |
| 5 | जात | | | | | | | | |
| 6 | जातीचा प्रवर्ग योग्य त्या ( √ ) ठिकाणी करावे | | | | | | | | |
| | अ.जा. SC | अ.ज ST | वि.जा.अ VJ (A) | भ.ज.ब NT(B) | भ.ज.क NT(C) | भ.ज.ड NT(D) | विमाप्र SBC | इ.मा.व OBC | खुला OPEN |
| | | | | | | | | | |
| 7 | अनुसूचित जामातीचे जात वैधता प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक - | | | | | | | | |

| 8 | जन्मतारीख | D | D | M | M | Y | Y | Y | Y |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अंकात | | | | | | | | |
| | अक्षरात | | | | | | | | |
| | दि.31.03.2020 रोजी वय | वर्ष | | | महिणे | | | दिवस | | |

| 9 | राष्ट्रीयत्व | | स्त्री/पुरुष | | विवाहित/अविवाहित | |
|---|---|---|---|---|---|---|
| 10 | अर्जदार अपंग आहे काय ? होय/नाही | | असल्यास,अपंगात्वाचा प्रकार कोणता ? (अंध/अल्पदृष्टी/अस्थीव्यंग/कर्णबधीर | | | |

| 11 | शैक्षणिक अर्हता (Educational Qualification) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | उत्तीर्ण परीक्षा | शैक्षणिक संस्था/मंडळ/ विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण वर्ष | टक्केवारी | मुख्यविषय |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| 12 | तांत्रीक अर्हता असल्यास (Technical Qualification) | | | |
|---|---|---|---|---|
| | उत्तीर्ण परीक्षा | उत्तीर्ण झाल्याचा महिना व वर्ष | गुणांची टक्केवारी | श्रेणी |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

| 13 | संगणक अर्हता असल्यास ( Computer Literacy ) | | | |
|---|---|---|---|---|
| | उत्तीर्ण परीक्षा | उत्तीर्ण झाल्याचा महिना व वर्ष | गुणांची टक्केवारी | श्रेणी |
| | MS-CIT | | | |
| | इतर संगणक अर्हता | | | |

| 14 | प्रशासकीय अनुभव असल्यास ( Administrative Experience) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संस्थेचे नांव | धारण केलेले पद | वेतन | सेवेचा कालावधी | | अनुभव | | |
| | | | | पासुन | पर्यंत | वर्ष | महिने | दिवस |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

| 15 | स्वसाक्षांकीत जोडलेले सहपत्रे (Enclosures) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अ. क्र | सहपत्राचे नांव | सहपत्र क्रमांक | अ.क्र | सहपत्राचे नांव | सहपत्र क्रमांक |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

<u>**प्रतिज्ञापत्र**</u>

मी  प्रमाणित करतो की, हया अर्जात दिलेली माहिती खरी असुन त्यापृष्टर्थ मी कागदपत्र तपासणी वेळी मुळ प्रमाणपत्राच्या प्रती सादर करीन.मी आणखी असेही प्रमाणित करतो की,वर दिलेली माहिती खोटी असल्याचे आढळुन आल्यास माझ्याविरुध्द कायदेशिर कारवाई करण्यात येईल तसेच या माहितीच्या आधारे होणारी शिफारस / नियुक्ती रद्दबातल होईल याची जाणीव आहे.त्यासंबधीचा नियुक्ती प्राधिका-याचा निर्णय माझ्यावर बंधनकारक असुन माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण :-                                   अर्जदाराची स्वाक्षरी :-

दिनांक :-                                   अर्जदाराचे नाव :-

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम,2005 मधील प्रतिज्ञापत्राचा नमूना अ**
**प्रतिज्ञापत्र**
**नमूना — अ (नियम 4 पहा)**

मी, ------------------------------------------------------- श्री.---------------------------------------यांचा मुलगा/मुलगी वय --- वर्ष राहणार ------------------------------------------------------ याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करतो की,

1) मी अनुसूचित जमाती प्रवर्गात ----------------------------------------- या पदासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

2) आज रोजी मला --- इतकी हयात मुले आहेत त्यापैकी दिनांक 28 मार्च,2005 यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ---- आहे.

3) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक 28 मार्च, 2005 नंतर जन्माला आलेल्या मुलामूळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणिव आहे.

ठिकाण :- अर्जदाराची स्वाक्षरी :-

दिनांक :- नांव :-

**भरती प्रक्रियेचा संभाव्य कार्यक्रम**

| | | |
|---|---|---|
| 1 | जाहिरात प्रसिध्द करणे | दि.13 मार्च,2020 |
| 2 | ऑफलाईन अर्ज स्किारण्याचा अंतिम दिनांक | 31 मार्च,2020 सांय.6.15 पर्यंत (कार्यालयीन वेळेत शा.सुट्टीचे दिवस वगळुन) |
| 3 | अर्जाची छाननी करुन पात्र/अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | 15 एप्रिल,2020 |
| 4 | लेखी परीक्षेसाठी प्रवेशपत्र पाठविणे / प्राप्त करुन घेण्याचा दिनांक | 02 मे,2020 |
| 5 | ऑफलाईन पध्दतीने लेखी परीक्षा दिनांक | 03 मे,2020 |
| 6 | लेखी परीक्षेच्या अनुषंगाने आदर्श उत्तरपत्रिका वेबसाईटवर प्रसिध्द करणे | 6 मे ,2020 |
| 7 | आदर्श उत्तरपत्रिकेच्या अनुषंगाने चुकीच्या छाप प्रश्नाविरुध्द आक्षेप (असल्यास) प्राप्त करणे | 13 मे,2020 |
| 8 | लेखी परीक्षेचा निकाल वेबसाईटवर जाहीर करणे | 22 मे,2020 |
| 9 | संभाव्य निवड व प्रतिक्षा यादी वेबसाईटवर प्रसिध्द करणे | 22 मे 2020 |
| 10 | कागदपत्रे तपासणी | 01जुन ,2020 |
| 11 | लेखी परीक्षेतील गुणांचे आधारे अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी वेबसाईटवर जाहिर करणे | 04 जुन ,2020 |
| 12 | नियुक्तीचे आदेश निर्गमित करणे | 08 जुन ,2020 |

स्वा/-
भाग्यश्री बानायत (भा.प्र.से)
संचालक तथा अध्यक्ष,राज्यस्तरीय निवड समिती
रेशीम संचालनालय,महा.राज्य,नागपूर